महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

===============================================================

जावक क्रमांक – ४०५/१२ दिनांक :- ०५ फेब्रुवारी, २०२५

**प्रसिद्धिपत्रक**

# एमएमआर ग्रोथ हब प्रकल्पांतर्गत म्हाडा पुढील पाच वर्षात उभारणार आठ लाख घरे - उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे

**म्हाडा कोकण मंडळातर्फे २१४७ सदनिका व ११७ भूखंड विक्रीसाठी उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते व परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत संगणकीय सोडत उत्साहात**

मुंबई, दि. ०५ फेब्रुवारी, २०२५ :- केंद्र शासनाच्या नीती आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार मुंबई महानगर प्रदेशात गृहनिर्माण ग्रोथ हब प्रकल्प राबविण्यात येणार असून या ग्रोथ हब प्रकल्पांतर्गत सन २०३० पर्यंत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) माध्यमातून सुमारे आठ लाख घरे उभारली जाणार आहेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री. श्री एकनाथ शिंदे यांनी आज केले

म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे २१४७ सदनिका व ११७ भूखंड विक्रीकरिता राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते व परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाणे येथील काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात आज संगणकीय सोडत उत्साहात काढण्यात आली. यावेळी श्री. शिंदे बोलत होते

उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे म्हणाले की, सर्वसामान्यांची गृहस्वप्नपूर्ती म्हाडा करीत आहे. दर्जेदार परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे. शासनाने समाजातील सर्व घटकांसाठी योजना आणल्या आहेत. 'म्हाडा'च्या २३४७ सदनिका व ११७ भूखंडांसाठी सुमारे २४,७११ अर्जदारांचा उत्स्फूर्त प्रतिसादावरून म्हाडाची विश्वासार्हता वाढली आहे हे दिसून येते. 'म्हाडा'ने सोडतीतील विजेत्या अर्जदारांना सदनिकांचा ताबा तात्काळ द्यावा व गुणवत्तेच्या बाबतीत कुठलीही तडजोड करू नये. सर्वसामान्य नागरिकांना उत्तम दर्जेदार घरी मिळाली पाहिजे, यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील असून त्याकरिता काही नियम बदलण्याचे सुतोवाच श्री. शिंदे यांनी केले. महाराष्ट्र शासन लवकरच नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर करणार असून या धोरणांतर्गत अधिकाधिक परवडणारी घरे, भाडेतत्त्वावरील घरे उभारण्यात येणार असून ज्येष्ठ नागरिक, काम करणाऱ्या महिला, विद्यार्थी यांच्यासाठी वसतिगृह बांधण्याचे प्रयोजन आहे. गिरणी कामगार, पोलिस यांच्यासाठी घरे बांधण्यावर भर दिला जाणार आहे.

मानवी हस्तक्षेपविरहित संपूर्णतः ऑनलाइन अशा IHLMS २.० या संगणकीय प्रणालीद्वारे ही सोडत प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सदर सोडत नवीन संगणकीय प्रणाली IHLMS 2.0 (Integrated Housing Lottery Management System) द्वारे होत आहे. या नूतन प्रणालीनुसार अर्ज नोंदणीकरण व पात्रता निश्चिती झाल्यानंतरच अर्जदार सोडत प्रक्रियेत सहभाग घेत आहे. सोडतीत विजेता ठरल्यानंतर, अर्जदारास सूचना पत्र पाठविले जाणार असून त्यातील तरतुदींची पूर्तता केल्यानंतर विजेत्या अर्जदारांना तात्पुरते देकार पत्र पाठविले जाणार आहे. ही सर्व प्रक्रिया अत्यंत सोपी व सुलभ ठरल्यामुळे नागरिकांचा सोडतीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला

असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले. आशिया खंडातील सर्वात मोठा समूह पुनर्विकास प्रकल्प ठाणे येथे राबविण्यात येत असून या माध्यमातून हजारो घरे उभारली जाणार आहेत. शहरांमध्ये नवीन शहर निर्माण करायचा प्रयत्न या माध्यमातून महाराष्ट्र शासन करीत आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए), 'म्हाडा'चे रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प मार्गी लावण्यासाठी शासनाच्या विविध संस्था यांना एकत्र आणून त्यांच्या माध्यमातून हे प्रकल्प मार्गी लावले जात आहेत. घाटकोपर येथील रमाबाई आंबेडकर नगर प्रकल्प हा त्याचाच एक भाग आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत मोठ्या प्रमाणात राज्यात गृह बांधणी केली जात आहे. या सोडतीत घर न लागलेल्या अर्जदारांनी निराश न होता त्यांच्यासाठी लवकरच म्हाडातर्फे सोडत जाहीर काढली जाईल अशी माहिती उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी दिली.

'म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी प्रास्ताविक केले. श्री. जयस्वाल म्हणाले की, म्हाडातर्फे दरवर्षी राज्यात सुमारे ३०,००० घरांची सोडत काढण्याचे नियोजन असून दर तीन ते सहा महिन्यात म्हाडाच्या कुठल्यातरी मंडळाची सोडत काढण्याचे प्रस्तावित आहेत. गेल्या दीड वर्षातील म्हाडा कोकण मंडळांची ही तिसरी संगणकीय सोडत आहे. गेल्याच आठवड्यात पुणे मंडळाने देखील ३६६२ सदनिकांची सोडत काढली. आगामी नवीन गृहनिर्माण धोरणामध्ये म्हाडातर्फे विकास नियंत्रण नियमावली ३३(५), ३३(७), ३३(९), ३३(२४) बदल प्रस्तावित केले असून त्या माध्यमातून अधिकाधिक परवडणारी दर्जेदार घरे उपलब्ध होणार आहेत. तसेच भाडेतत्त्वावरील घरे उपलब्ध व्हावीत यासाठीही धोरणात बदल प्रस्तावित केले आहेत.

कोकण मंडळाच्या २१४७ सदनिका व ११७ भूखंड विक्रीकरिता सुमारे २४,९११ अर्ज अनामत रकमेसह प्राप्त झाले. कोकण मंडळाने ठाणे शहर व जिल्हा, रायगड, सिंधुदुर्गमधील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत उभारलेल्या सदनिका व भूखंड विक्रीच्या सोडतीसाठी अर्ज भरणा प्रक्रियेला ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रारंभ करण्यात आला. सोडतीत सहभाग घेतलेल्या अर्जदारांची संख्या लक्षात घेता मंडळातर्फे व्यापक नियोजन करण्यात आले . अर्जदारांना 'वेबकास्टिंग' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडतीच्या कार्यक्रमाचे घरबसल्या थेट प्रक्षेपण (Live) बघण्याची सुविधा म्हाडाच्या @mhadaofficial या अधिकृत युट्यूब चॅनल व फेसबूक पेजवरून उपलब्ध करून देण्यात आली. युट्यूब चॅनलद्वारे सोडतीचे थेट प्रक्षेपण सुमारे ११,००० नागरिकांनी बघितले. सोडतीमधील विजेत्या अर्जदारांची यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या वेबसाईटवर सायंकाळी ६.०० वाजता प्रसिद्ध करण्यात येणार असून विजेत्या अर्जदारांना ईमेल व एसएमएसद्वारेही विजेता ठरल्याबाबतची माहिती तात्काळ कळविली जाणार आहे. या कार्यक्रमाला व्यासपीठावर ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री. सौरभ राव, 'म्हाडा'चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री अनिल वानखडे, म्हाडाचे मुख्य अभियंता श्री. महेश जेस्वानी, मुख्य अभियंता श्री. शिवकुमार आडे, कोकण मंडळाच्या मुख्याधिकारी श्रीमती रेवती गायकर, मुंबई मंडळाच्या सहमुख्य अधिकारी श्रीमती वंदना सूर्यवंशी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ आदी उपस्थित होते.

म्हाडाचे उपअभियंता श्री. अभयकुमार कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial


d Area Developement Authority
KB24_04 - 15 PERCENT INTEGRATED TOWNSHIP PROJECT NEW




म्हाडा
MHADA
कोकण विभागातील विविध गृह


म्हाडा
MHADA
सोडत म्हाडाची स्वप्नपूर्ती घरांची...
कोकण विभागातील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत
व ११७ भूखंड विक्रीसाठी संगणकीय सोडत
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ




म्हाडा
MHADA


Maharashtra Housing and Area Developement Authority
KB24_04 - 15 PERCENT INTEGRATED TOWNSHIP PROJECT NEW
414 - Usarghar-Sandap, Tal. Kalyan, Dist. Thane EWS M/s. Horizon Project Pvt. Ltd.
GP - General Public
Winners


Area Developement Authority
KB24_02 - MHADA TENEMENTS
View Result
Scheme: 320A - Bhandarli, Thane (New T/s.)
2240000354
SAFA JAVEED JOAD
Tenement: 1, -, 1, 102
Priority: 2
KB24_03 - MHADA Plots
Scheme: 253A - Oras , Sindhudurag
2340000183
VIKAS NATHU SANAS
Tenement: Plot, -, 0, 17
Priority: 4
Category: GP - General Public


KB24_02 - MHADA TENEMENTS
Scheme: 320A - Bhandarli, Thane (New T/s.)
2240000407
TEJAS SUBHASH LANDGE
Tenement: 1, -, 6, 603
Priority: 17


KB24_02 - MHADA TENEMENTS
Scheme: 320A - Bhandarli, Thane (New T/s.)
2240000118
NILESH YASHWANT PASHTE
Tenement: 1, -, 6, 606
Priority: 18


KB24_02 - MHADA TENEMENTS
View Result
Scheme: 352A - Virar Bolinj (New T/s.)
2240000464
MADHURA SUDESH KAMBLI
Tenement: 18, -, 1, 103
Priority: 1
KB24_03 - MHADA


Infrastructure
Public
Winners
-, D, 2, 202
2140010794
-, D, 3, 301
-, D, 3, 302
-, D, 3, 303
-, D, 4, 402


Winners
2140030059
PRATIK SHRIKANT SARWADE
-, D, 5, 502
2140000036
-, C, 7, 704
-, D, 0, 1


Waitlist
2140000290
PARASHARAM GAURA NAIK
Tenement


SIVE HOUSING SCHEME
Print
ship LLP
Waitlist
2140006843
KAMLESH VASUDEO CHUDJI
Winners
Tenement
A-1, -, 17, 1704


Journalist
Waitlist
Applicant
2140012922
PANKAJ DAYASHANKAR PANDEY

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

================================================================

Outward No. : 205/12 Dt. February 05, 2025

Press Release

## Under the MMR Growth Hub project, MHADA will build eight lakh houses in the next five years - Deputy Chief Minister Shri. Eknath Shinde

Deputy Chief Minister Shri Eknath Shinde Conducts Computerized Lottery for 2,147 Homes and 117 Plots Under MHADA Konkan Board in Presence of Transport Minister Shri Pratap Sarnaik

Mumbai, February 5, 2025: The Government of Maharashtra is accelerating efforts to expand affordable housing, with a focus on large-scale development under the MMR Growth Hub Project. As part of this initiative, the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) will construct eight lakh homes by 2030, in alignment with NITI Aayog's recommendations.

This announcement was made today by Deputy Chief Minister and Housing Minister Shri Eknath Shinde, who emphasized the government's commitment to providing high-quality, affordable homes to citizens.

The computerized housing lottery, organized by the MHADA Konkan Housing Board, took place at Kashinath Ghanekar Auditorium in Thane. The draw was conducted at 1:00 PM in the presence of Deputy Chief Minister and Housing Minister Shri Eknath Shinde, along with Transport Minister Shri Pratap Sarnaik. Speaking on the occasion, Shri Shinde emphasized the government's commitment to providing affordable and high-quality homes for all sections of society. He stated that MHADA is making homeownership a reality for thousands of families, ensuring that quality housing remains accessible and affordable.

Shri Shinde further noted that MHADA's transparent housing allocation process has gained widespread public trust, as demonstrated by the overwhelming response to the lottery. This

edition received 24,711 applications for 2,147 homes and 117 plots. He directed MHADA officials to ensure that successful applicants receive possession of their homes at the earliest, while maintaining strict quality standards. He also announced that the government is preparing to introduce a new housing policy, which will include affordable housing, rental housing, and hostels for senior citizens, working women, and students. Special provisions will also be made for housing mill workers and police personnel.

The computerized lottery draw was conducted using IHLMS 2.0, a fully digital, automated, and interference-free system. Only applicants who met the eligibility criteria were included in the draw. The winners will receive an official intimation letter, followed by a provisional allotment letter upon completion of formalities.

Shri Shinde also announced that Asia's largest cluster redevelopment project is being implemented in Thane, which will result in the construction of thousands of new homes. He further stated that the government is expediting slum redevelopment, integrating Slum Rehabilitation Authority (SRA) projects, and resolving stalled MHADA redevelopment schemes to enhance the overall housing stock. The Ramabai Ambedkar Nagar Project in Ghatkopar was highlighted as a key example of these efforts.

Delivering the keynote address, MHADA Vice President and Chief Executive Officer Mr. Sanjeev Jaiswal stated that MHADA aims to release approximately 30,000 homes annually across various housing boards, with lotteries planned every three to six months. This marks the third computerized lottery conducted by the MHADA Konkan Board in the past 18 months, following the Pune Board's lottery for 3,662 homes last week. Mr. Jaiswal further informed that under the upcoming state housing policy, amendments have been proposed to Development Control Rules (DCR) under sections 33(5), 33(7), 33(9), and 33(24) to accelerate the construction of affordable housing. Provisions for rental housing are also being introduced.

The lottery event witnessed an enthusiastic response from home seekers. To ensure accessibility, the event was broadcast live via MHADA's official YouTube and Facebook channels, attracting over 11,000 live viewers. The final list of successful applicants will be published at 6:00 PM on housing.mhada.gov.in, and winners will also receive notifications via SMS and email.

The event was attended by Thane Municipal Commissioner Mr. Saurabh Rao, MHADA Deputy Chief Executive Officer Mr. Anil Wankhede, MHADA Chief Engineer Mr. Mahesh Jeswani, Chief Engineer Mr. Shivkumar Aade, Konkan Board Chief Officer Mrs. Revati Gaikar, Mumbai Board Deputy Chief Officer Mrs. Vandana Suryawanshi, and Mumbai Repair and Reconstruction Board Deputy Chief Officer Mr. Umesh Wagh. The program was anchored by MHADA Deputy Engineer Mr. Abhaykumar Kulkarni.

###

(Vaishali Gadpale)

Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial